31

महाराष्ट्रातील स्वायत्त महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांच्या रोजगारप्राप्तीचा अभ्यास

डॉ. पाठक सुहास सखाराम
सहाय्यक प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

झाकडे अर्चना प्रल्हाद
संशोधक विद्यार्थीनी, शिक्षणशास्त्र विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

****

सारांश

महाराष्ट्रातील स्वायत्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या रोजगारप्राप्तीसाठी करण्यात येणारे प्रयत्न, राबविण्यात येणारे विविध उपक्रम त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या रोजगारप्राप्तीसाठी प्राध्यापक, विभागप्रमुख व प्राचार्य यांच्या योगदानाविषयीचा अभ्यास यात करण्यात आला आहे. प्रस्तुत संशोधनाच्या अभ्यासासाठी १५ स्वायत्त महाविद्यालये घेतली होती. तसेच संशोधनासाठी सर्वेक्षण संशोधन पद्धती निवडली होती. त्याचबरोबर माहिती संकलनाकरीता विद्यार्थ्यांसाठी प्रश्नावली, प्राध्यापकांसाठी प्रश्नावली, विभागप्रमुखांसाठी प्रश्नावली आणि प्राचार्यांसाठी मुलाखत या स्वनिर्मित साधनांचा तसेच महाविद्यालयाच्या संकेतस्थळावरील माहीतीचाही उपयोग करण्यात आला होता.

बदलत्या काळानुसार म्हणजेच आधुनिक जगातली आव्हाने स्वीकारायची पात्रता विद्यार्थ्यांत निर्माण होण्यासाठी संलग्न महाविद्यालयांना स्वायत्तता देण्याचे धोरण महाराष्ट्रात राबविले जात आहे. संलग्न महाविद्यालयांद्वारे उच्च शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांसमोर बेरोजगारीची समस्या असते. म्हणूनच स्वायत्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या विकासाबरोबरच त्यांच्या रोजगारप्राप्तीसाठी प्रयत्न करणे आवश्यक ठरते.

पारंपारिक विद्यापीठ शिक्षण पद्धतीमध्ये महाविद्यालयाने विशिष्ट विद्यापीठाशी संलग्न राहून निश्चित वेळेत अभ्यासक्रमात नियम, मूल्यमापन पद्धती यांचे काटेकोरपणे पालन करणे अत्यावश्यक असते. संलग्न महाविद्यालयांवर विद्यापीठांचे पूर्ण नियंत्रण असते. त्यामुळे महाविद्यालयांना विद्यापीठाची धोरणे, अभ्यासक्रम कालबाह्य झाले असले तरी राबवावे लागतात. उपक्रमशीलतेला वाव असत नाही. त्याचबरोबर विद्यार्थीहिताचे कोणतेही बदल प्रचलित पद्धतीत करता येत नाहीत. सध्याची विद्यापीटीय शिक्षणपद्धती अलवचिक, उपक्रमहिन आणि साचेबद्ध झाली असून जागतिकीकरणाच्या वातावरणात विद्यार्थी उद्योगक्षेत्राच्या मागणीप्रमाणे अपेक्षा पूर्ण करु शकत नाही. उलट विद्यापीठीय शिक्षणपद्धती व मूल्यमापन पद्धती सुशिक्षित बेरोजगार निर्माण करणारे कारखाने या संज्ञेला विद्यापीठे पात्र ठरत आहेत. स्वायत्त महाविद्यालयांसमोर विविध आव्हाने आहेत. शिक्षणकेंद्रीत अभ्यासक्रमाऐवजी विद्यार्थीकेंद्रीत अभ्यासक्रम आणि त्याचबरोबरच अध्ययन - अध्यापन पद्धती व साधने, मूल्यमापन पद्धती व साधने यामध्येही गुणवत्ताप्रधान बदल करावे लागतात. स्वायत्ततेनंतर महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासासाठी विविध नवनवीन उपक्रम राबविले तरच विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक व रोजगारविषयक तसेच जीवनविषयक गरजांची पूर्तता होण्यासही मदत होते. महाराष्ट्रातील स्वायत्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या रोजगारप्राप्तीसाठी अभ्यासक्रम तयार करण्यापासून ते रोजगारप्राप्तीपर्यंत अनेक निर्णय घ्यावे लागतात. कमीत कमी वेळात जास्तीत जास्त गुणवत्तापूर्ण बदल स्विकारुन शिक्षणप्रक्रीयेला योग्य दिशा द्यावी लागते.

गरजः महाराष्ट्रातील स्वायत्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या रोजगारप्राप्तीचा अभ्यास करणे गरजेचे वाटते.

उपयोगिताः महाराष्ट्रातील स्वायत्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या रोजगारप्राप्तीसाठी करण्यात येणाऱ्या प्रयत्नांची व त्यासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहीती मिळण्यासाठी उपयुक्त आहे.

उद्दिष्टेः

१. महाराष्ट्रातील स्वायत्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या रोजगारप्राप्तीसाठी करण्यात येणाऱ्या प्रयत्नांचा अभ्यास करणे.

२. महाराष्ट्रातील स्वायत्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या रोजगारप्राप्तीसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचा अभ्यास करणे.

परिकल्पनाः महाराष्ट्रातील स्वायत्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या रोजगारप्राप्तीच्या दृष्टीकोनातून प्रयत्न केले जात असावेत.

संशोधन पद्धतीः प्रस्तुत संशोधनाच्या अभ्यासासाठी सर्वेक्षण संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला होता.

नमुना निवडः प्रस्तुत संशोधनाच्या अभ्यासासाठी महाराष्ट्रातील १५ स्वायत्त महाविद्यालये निवडण्यात आली होती.

संशोधन साधने: प्रस्तुत संशोधनाच्या अभ्यासासाठी महाराष्ट्रातील स्वायत्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी प्रश्नावली, प्राध्यापकांसाठी प्रश्नावली, विभागप्रमुखांसाठी प्रश्नावली आणि प्राचार्यांसाठी मुलाखत तसेच महाविद्यालयाच्या संकेतस्थळावरील माहितीचाही उपयोग केला होता.

स्वायत्त महाविद्यालयातील अभ्यासक्रमाबाबत विद्यार्थ्यांच्या मताविषयी माहिती दर्शविणारे कोष्टक १.

अ. क्र.	प्रतिसाद	प्रतिसादक संख्या	टक्केवारी
१	घोकंपट्टी करण्यास लावणारा	००	०.००%
२	आकलनक्षम [illegible]	००	०.००%
३	उद्योगप्रधान	२५	१६.६६%
४	रोजगारनिर्मितीप्रधान	१०	६.६६%
५	[illegible]	३०	२०.००%
६	कालबाह्य व बोजड	००	०.००%
७	उद्योगप्रधान, रोजगारप्राप्त व आकलनक्षम	८५	५६.६६%
	एकुण	१५०	१००.००%

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, स्वायत्त महाविद्यालयातील अभ्यासक्रमाबाबत विद्यार्थ्यांनी मत व्यक्त केले असून ५६.६६ टक्के विद्यार्थ्यांच्या मते, स्वायत्त महाविद्यालयातील अभ्यासक्रम उद्योगप्रधान, रोजगारप्राप्त व आकलनक्षम आहे.



विद्यार्थ्यांच्या रोजगारप्राप्तीसाठी करण्यात येणाऱ्या प्रयत्नांविषयी माहिती दर्शविणारे कोष्टक २.

अ. क्र.	प्रतिसाद	प्रतिसादक संख्या	टक्केवारी
१	औद्योगिक व व्यापारी संस्थांशी करार	०३	२०.००%
२	विद्यार्थ्यांची व कंपनीची माहिती प्रकाशित करणे	०२	१३.३३%
३	मुलाखतीची संपूर्ण तयारी व व्यक्तिमत्वाचा अभ्यास	०२	१३.३३%
४	क्षेत्रभेट, आंतरवासिता कार्यक्रम व वरील सर्व	०८	५३.३३%
	एकुण	१५	१००.००%

विद्यार्थ्यांच्या रोजगारप्राप्तीसाठी करण्यात येणाऱ्या प्रयत्नांविषयी माहिती संदर्भातील प्राचार्यांच्या मताविषयीचे वरील कोष्टक असून ५३.३३ टक्के प्राचार्य क्षेत्रभेट, आंतरवासिता कार्यक्रम व वरील सर्व प्रयत्न करत असल्याचे दिसून येते.



निष्कर्ष:

१) महाराष्ट्रातील सर्वच स्वायत्त महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या रोजगारप्राप्तीसाठी प्रयत्न करण्यात येतात.

२) ५६ टक्के स्वायत्त महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या मते, अभ्यासक्रम बनविताना विद्यार्थ्यांच्या रोजगारप्राप्तीचा विचार केला जातो.

३) महाराष्ट्रातील सर्वच स्वायत्त महाविद्यलयात रोजगारनिर्मिती केंद्र उपलब्ध आहे.

४) महाराष्ट्रातील सर्वच स्वायत्त महाविद्यलयात परिसर मुलाखतीचे आयोजन केले जाते.

५) महाराष्ट्रातील सर्वच स्वायत्त महाविद्यलयांनी विविध संस्थांशी (राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय) करार केले आहेत.

६) महाराष्ट्रातील सर्वच स्वायत्त महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या रोजगारप्राप्तीसाठी औद्योगिक सहल, क्षेत्रभेट, छात्रसेवाकाल यांचे आयोजन केले जाते.

७) महाराष्ट्रातील ६० टक्के स्वायत्त महाविद्यालये विद्यार्थ्यांची प्रोफाईल बनवून त्यांच्या संकेतस्थळावर प्रकाशित करते.

८) महाराष्ट्रातील सर्वच स्वायत्त महाविद्यालये त्यांच्या संकेतस्थळावर संबंधित रोजगार क्षेत्र, औद्योगिक क्षेत्र व उद्योगक्षेत्राची माहिती प्रकाशित करतात.

९) महाराष्ट्रातील सर्वच स्वायत्त महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या रोजगारप्राप्तीसाठी रिजुमे लिहिण्यासाठी मार्गदर्शन केले जाते.

१०) महाराष्ट्रातील सर्वच स्वायत्त महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या रोजगारप्राप्तीसाठी मुलाखतीची तयारी करून घेतली जाते.

११) ४२.८५ टक्के महाराष्ट्रातील स्वायत्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या रोजगारप्राप्तीची टक्केवारी ५१ ते ७५ टक्क्यांदरम्यान आहे.

१२) ७६ टक्के विद्यार्थ्यांच्या मते, त्यांच्या विकासासाठी पुरेशी संधी उपलब्ध करुन दिली जाते.

१३) सर्वच विद्यार्थ्यांच्या मते, सामाजिक, सांस्कृतिक, अभ्यासपूरक उपक्रम, क्रीडा, प्रकल्प, कार्यशाळा, परिषद, चर्चसत्र या सर्व उपक्रमांचे आयोजन केले जाते.

१४) ३० टक्के विभागप्रमुखांच्या मते, विविध क्षेत्रातील तज्ज्ञांना गेस्ट लेक्चरसाठी आमंत्रित केले जाते.

१५) ३० टक्के विभागप्रमुखांच्या मते, महाविद्यालयच्या स्वायत्ततेनंतर गरजांची पूर्तता होते.

१६) ५६.६६ टक्के विद्यार्थ्यांच्या मते, स्वायत्त महाविद्यालयातील अभ्यासक्रम हा उद्योगप्रधान, रोजगारप्राप्त व आकलनक्षम आहे.

१७) ५३.३३ टक्के प्राचार्यांच्या मते, क्षेत्रभेट / आंतरवासिता कार्यक्रम व वरील सर्व प्रयत्न विद्यार्थ्यांच्या रोजगारप्राप्तीसाठी केले जातात.

संदर्भग्रंथः

१. गोगटे, श्री. ब. (२०११). मराठवाड्यातील शिक्षण एकविसाव्या शतकातील आव्हाने, औरंगाबादः स्वामी रामानंद तीर्थ संशोधन संस्था.

२. भांडारकर, के. एम. (२०१०). सुलभ शैक्षणिक संख्याशास्त्र, पुणेः नित्यनूतन प्रकाशन.

३. घोरमोडे, के. यु. आणि घोरमोडे, के. (२००६). शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे, नागपूरः विद्या प्रकाशन.

४. देव, ने. आणि कुलकर्णी, अ. (२०१३). शैक्षणिक संशोधन, पुणेः नित्यनूतन प्रकाशन.

५. जाधव, र. व गायकवाड जी. (२०१५). शिक्षणातील आधुनिक विचारप्रवाह, औरंगाबादः कैलास पब्लिकेशन.

❑❑❑